प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक मो.न.9422660077

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार १० ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# भर पावसात निघाले प्रहार जनशक्तीच्या आक्रोश महामोर्चाचे चक्रीवादळ...

## बच्चू कडूंनी सरकारला दिली ५ सप्टेंबरपर्यंत मुदत

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी**

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांनी महायुतीमध्ये असतानाही राज्य सरकारच्या विरोधात आक्रोश मोर्चा काढून आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारला मोठा इशारा दिला आहे. आमदार कडू यांच्या नेतृत्वाखाली आज ९ ऑगस्ट क्रांती दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये काढण्यात आलेल्या 'आक्रोश मोर्चा' च्या माध्यमातून राज्यातील शेतकरी, दिव्यांग, प्रकल्पग्रस्त, कामगारांच्या विविध मागण्या निवेदनाद्वारे सरकारपुढे मांडल्या. ५ सप्टेंबर पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास २२ सप्टेंबर ला मुंबईत धडक देणार, असा इशारा यावेळी आमदार कडू यांनी दिला. शहरातील क्रांती चौक ते दिल्ली गेट येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर



मोर्चा काढून आमदार कडू यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले आहे. आवाहनाला प्रतिसाद देऊन राज्याच्या विविध भागातून आलेल्या दिव्यांग, शेतकरी, कामगार आदींनी भर पावसात निघालेल्या मोर्चामध्ये सहभाग नोंदवला.



तर दोन पाऊले मागे येऊ मोर्चाद्वारे करण्यात आलेल्या मागण्या जर सरकारने तात्काळ मान्य करून त्याबाबत त्वरित शासननिर्णय काढला, तर आगामी विधानसभा निवडणुकांत स्वतंत्रपणे लढण्याबाबत आपण दोन पावले मागे घेऊन महायुतीला पाठिंबा देऊ असे आमदार कडू यांनी सांगितले. सरकार जर या मागण्यांचा विचार करणार नसेल तर शेतकरी, दिव्यांग, शेतमजूर, कामगार, इत्यादींना सोबत घेऊन स्वतंत्रपणे निवडणुकांना सामोरे जाण्याबाबत आपण विचार करु असा इशाराही आमदार कडू यांनी महायुतीला दिला आहे. यावेळी प्रहारचे आमदार राजकुमार पटेल, कार्याध्यक्ष बल्लु जवंजाळ, प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे दिव्यांग संघटना अध्यक्ष रामदास खोत ई. पदाधिकारी उपस्थित होते. आक्रोश मोर्चादरम्यान या केल्या मागण्या सरकारने स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, शेतकरी कर्जमाफी, दोन वर्षातील कर्जाच्या व्याज आणि मुद्दलावर ५० टक्के सवलत मिळावी, स्वतंत्र कांदा निर्यातबंदी धोरण बनवावे, फलोत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज द्यावे, शेतमजुरांसाठी स्वतंत्र योजना सुरू करावी इत्यादी मागण्या केल्या आहेत. राज्यात स्वतंत्र दिव्यांग विभाग असतानाही दिव्यागांना दिव्यांगांना मिळणाऱ्या मासिक वेतनात वाढ करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करावे, प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र महामंडळ सुरू करावे, शहरी व ग्रामीण घरकुल योजनांमधील निधीत समानता आणावी, बेघरांना घरे द्यावीत, अर्धवेळ शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करावी, मुंबईतील राज्यपाल बंगल्याचा लिलाव करून तो पैसा योजनांसाठी वापरात आणावा, मुंबईतील पारशी व्यापाऱ्यांनी हडपलेली जमीन शासनजमा करावी आदी १७ प्रकारच्या विविध मागण्यांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

# सिन्नर येथे जागतिक आदिवासी दिन साजरा.



**नाशिक।सुरेश इंगळे.**

सिन्नर येथे आदिवासी उत्सव समितीच्या वतीने जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पायी रॅली , प्रबोधन सभा, आदीसह विविध कार्यक्रम झाले. खासदार राजाभाऊ वाजे, सह्याद्री युवा मंचचे संस्थापक/ अध्यक्ष - उदय भाऊ सांगळे, साहित्यिक विजयकुमार कर्डक यांची प्रमुख उपस्थिती होती. जागतिक आदिवासी दिनानिमित्त हुतात्मा स्मारकापासून पायी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच बस स्थानका जवळील महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, वावी वेस येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा, त्रिशूल नगर मापरवाडी रोड व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह समोरून रॅली काढण्यात आली. यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते .आदिवासी नृत्य व कलापथका चा कार्यक्रम करण्यात आला. यात असंख्य आदिवासी बांधवांनी आपल्या कला व नृत्य सादर केले. ही रॅली दुपारी १२ पासून सायंकाळी चार पर्यंत काढण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह येथे प्रबोधन सभा दुपारी चार वाजता घेण्यात आली. आदिवासी बांधवांनी सिन्नर येथे कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढविले.

# गाव भेट दौऱ्यात ठिकठिकाणी लाडक्या बहिणीकडून आ.आजबे यांचे जोरदार स्वागत

**पाटोदा प्रतिनिधी :-**

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांचा सध्या गाव भेट दौरा चालू असून शुक्रवार दिनांक 9 ऑगस्ट रोजी पाटोदा तालुक्यातील बारा ते तेरा गावांमध्ये त्यांनी भेट देऊन समस्या जाणून घेत लोकांचे प्रश्न तात्काळ सोडूण्यास प्राधान्य दिले यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केल्याबद्दल गावागावात लाडक्या बहिणींनी आमदार बाळासाहेब आजबे यांचे जोरदार स्वागत केले.

शुक्रवार दिनांक 9 ऑगस्ट रोजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांचा पाटोदा तालुक्यातील महेंद्रवाडी, सगळेवाडी, धस पिंपळगाव, तगारा ,व खडकवाडी, काकडहिरा, निरगुडी ,उखंडा पिठ्ठी, नायगाव, बेदरवाडी ,डोंमरी रोहतवाडी व करंजन या गावांना भेटी



देत आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी गावागावात जाऊन पारावर बसून गावातील समस्या समजावून घेत त्या तात्काळ सोडवल्या व शासनाच्या ज्या कल्याणकारी योजना आहेत त्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम या दौऱ्या दरम्यान करण्यात आले त्याचबरोबर आजपर्यंत करण्यात आलेला विकास कामांचे लोकार्पण व विविध विकास कामांचे शुभारंभ ही आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी बोलतानाआ आजबे म्हणाले की प्रत्येक गावामध्ये एक कोटी पेक्षा जास्त रुपयांचे विकासकामे आपण आजपर्यंत केली आहेत त्यामुळे गावातून आपल्याला लोकांचा प्रतिसाद मिळत आहे अनेक गावांमध्ये विकास कामाबरोबरच शासनाच्या ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत त्यामध्ये सिंचन विहीर शेत तलाव गाय गोठा यासारखे योजनाही कार्यकर्त्या व ग्रामपंचायतच्या मार्फत राबवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाने सुरू केलेला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना या योजनाला चांगला प्रतिसाद मिळाला असून येत्या 18 तारखेच्या आत दोन महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यावर पडणार आहेत त्याचबरोबर उज्वला गॅस योजना मध्ये तीन सिलेंडर तर शेतकऱ्यांसाठी कृषी पंपास मोफत वीज पुरवठा यासारख्या योजना शासनाने राबवले आहेत या सर्व योजनांचा शेतकऱ्यांनी व सर्वसामान्य जनतेने फायदा घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले या दौऱ्यामध्ये पाटोदा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष दीपक दादा घुमरे, ज्येष्ठ नेते विठ्ठल आण्णा सानप,सरपंच डॉ, प्रभाकर कवठेकर, सरपंच संदीप कवठेकर, सरपंच शिवाजी नेमाने सरपंच नारायण नागरगोजे ,गटप्रमुख मधुकर येवले केशव भोंडवे, किशोर जेधे, युवक तालुकाध्यक्ष युवराज झुणगुरे,अंगद भोंडवे, बाप्पासाहेब जाधव,अनिल दगडखैर, नानासाहेब कवठेकर ,बालाजी कवठेकर विजय काशिद, बन्सी खाडे ,उपसरपंच महादेव खाडे, अण्णासाहेब लवांडे ,शिवाजी मुळीक ,संजय कवठेकर ,बालाजी आवटे, महमूद पठाण ,हरी काशीद, राजाभाऊ काकडे ,संतोष बेंद्रे, गोरख बेद्रे, साहेबराव बेद्रे, श्रीकांत झुंनजुरे ,रमेश नागरगोजे, सरपंच संजय जायभाय धनंजय भुसनर शिवाजी भोसले यांच्यासह पिठ्ठी गणातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी रेहाना पठाण यांची नियुक्ती

**बीड - प्रतिनिधी**

राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण यांची नियुक्ती प्रदेश अध्यक्ष रोहिणी खडसे यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजिया खान, संसदरत्न खा. सुप्रिया सुळे, प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील, युवक प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख यांच्या सूचनेनुसार



रेहाना पठाण पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल रेहाना पठाण यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



सौ.शिवानी वरुण सरवदे
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : प्रा. वरुण विष्णु सरवदे, प्रो विष्णु सरवदे,प्रा. रेखा विष्णु सरवदे,भिमराव कांबळे (उपविभागीय अभियंता BSNL), अरविंद कांबळे (अव्वर सचिव मंत्रालय) चि. भुषण,चि. सुमेध, कु. श्रेया,कु. दिक्षा,कु. आस्था,चि. सम्यक

# शिरूर कासार तालुक्यातील विघनवाडी स्थानकावर रेल्वेची हाय स्पीड चाचणी अंमळनेर ते विघनवाडी पर्यंत धावली !

**शिरूर कासार।प्रतिनिधी**

जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न साकार झाल्यानंतर शिरूर कासार तालुक्याची देखील रेल्वे पाहण्याची प्रतीक्षा अखेर शुक्रवारी नागपंचमीच्या मुहूर्तावर पूर्ण झाली.अंमळनेर ते विघनवाडी या जवळपास एकूण तीस किमी अंतराच्या लोहमार्गावर रेल्वे इंजिनची आठ डब्यांसह हाय स्पीड टेस्ट भारतीय रेल्वे अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली.या वेळी




विघनवाडी रेल्वे स्थानकावर स्थानिक नागरिकांसह तालुक्यातील नागरिकांची दिवसभर मोठ्या संख्येने उपस्थिती होती.शिरूर कासार तालुका निर्मितीनंतर रेल्वेसाठी तब्बल 25 वर्षांची प्रतीक्षा तालुकावासियांना करावी लागली.नागमोडी वळणे घेत डोंगरदऱ्यातून रेल्वेचा मार्ग पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातून जात असून पुढे रायमोहा मार्गे बीड तालुक्यात प्रवेश करत असून लवकरच जिल्ह्याच्या ठिकाणी रेल्वे पोहचणार आहे.भारतीय रेल्वे विभागाच्या वतीने शुक्रवारी हाय स्पीड टेस्ट होणार असल्याचे तहसील कार्यालयाला कळविण्यात आले होते.त्यानुसार प्रभारी तहसीलदार शिवनाथ खेडकर यांनी रेल्वे स्थानक परिसरातील नागरिक आणि गुरे चारणाऱ्या लोकांना पत्राद्वारे कळविले होते.त्यानुसार शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासूनच स्थानीकचे नागरिक जमा झाले होते.या वेळी मोटारमन सतिश जयप्रकाश,विनोद वाघ यांच्यासह गोकुळ सवासे,प्रल्हाद विघ्ने,अंगद येवले,राजेंद्र येवले,रमेश महाडिक,प्रकाश साळवे यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बीड-नाळवंडी रस्त्याचे संपूर्ण काम करण्याचे लेखी आश्वासन द्या!

## अन्यथा १५ ऑगस्ट ला आत्मदहन करणार..! -प्रा.अण्णासाहेब राऊत

**बीड प्रतिनिधि**

इ.सन २०१२ पासून नाळवंडी, जूजगव्हाण, दहिफळ चिंचोली, लक्ष्मीआई तांडा, इत्यादी गावातील समस्त नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी हे सर्व बीड-नाळवंडी रस्त्याच्या संपूर्ण कामासाठी विविध आंदोलने, मोर्चे, उपोषण, ठिय्या आंदोलन, करत आहेत. परंतु इ.सन. २०१२ पासून बीड नाळवंडी रस्त्याची परिस्थिती सुधारत नसल्याकारणाने आपल्याकडे पुन्हा एकदा या रस्त्याच्या संपूर्ण कामासाठी निवेदन देण्यात येत आहे.त्यामध्ये आता प्रशासनाने कसलीही अडचण न सांगता कुठलेही कारण न देता कुठल्याही योजनेतून किंवा कुठल्याही बजेट मधून आमचा रस्ता संपूर्णपणे चांगला करण्याचे लेखी आश्वासन द्यावे! या रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष देऊन तात्काळ बीड-नाळवंडी रस्त्याचे संपूर्ण काम पूर्ण करावे ही नम्र विनंती! आमच्या विनंतीला मान देऊन आपण बीड-नाळवंडी रस्त्याची दुरवस्था सुधारत असल्याबाबतचे व रस्त्याचे संपूर्ण काम ठराविक कालमर्यादित पूर्ण करत असल्याबाबतचे लेखी आश्वासन १५ ऑगस्ट २०२४ पूर्वी द्यावे! अन्यथा बीड-नाळवंडी रस्त्याच्या कामासाठी मी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता आत्मदहन



करत असल्याचा इशारा आपणास या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तरी आपण तात्काळ या रस्त्याचे काम पूर्ण करावे ही नम्र विनंती. असे निवेदन माननीय जिल्हाधिकारी बीड यांना व त्यांच्यामार्फत मा.पंतप्रधान कार्यालय, दिल्ली. मा.केंद्रीयपरिवहनवरस्तेविकासमंत्री,केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री,दिल्ली. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मुंबई. मा.ग्रामविकास मंत्री,महाराष्ट्र राज्य,मुंबई. मा.पालकमंत्री, जिल्हा,बीड. मा.आमदार विधानसभा,बीड. मा.खासदार लोकसभा,बीड. मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड.यांना देण्यात आले आहे.

# भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी नागोबाचीवाडी ग्रामस्थांची ६६ लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**भगवानगड।प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.




श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे नागोबाचीवाडी (ता.जामखेड जि.अहिल्यानगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ६६ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## शिवसेना बीड जिल्हाप्रमुख प्रा. परमेश्वर सातपुते सर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



पिंपळवंडी।प्रतिनिधी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने भगवा सप्ताह आयोजित करण्यात आला होता,व तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.परमेश्वर सातपुते सर यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळा आंबेवाडी येथे प्रा.अशोक तात्या पवार शिवसेना प्रभारी तालुका प्रमुख पाटोदा यांच्या वतीने खाऊ व शालेय साहित्य वाटप करण्यात आले व शिक्षकवृंद यांच्याकडून या कार्यक्रमाचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाला रोहित पवार,युवा नेते नवनाथ पवार,दादासाहेब पवार, निलेश पवार,जयदत्त पवार,परवेज शेख यांच्या सह शिक्षकवृंद व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## कीर्तनकार श्रीकृष्ण महाराज उबाळे सेट परीक्षा उत्तीर्ण

**बीड (प्रतिनिधी)**

बीड तालुक्यातील आदर्श असणाऱ्या चऱ्हाटा गावचे सुपुत्र, जालना जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पाथरवाला बुद्रुक या शाळेत प्राथमिक पदवीधर या पदावर कार्यरत शिक्षक तथा वारकरी संप्रदायाचे युवा कीर्तनकार ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता आयोजित राज्य पात्रता परीक्षा 'सेट' ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी एम.ए. (मराठी साहित्य) या विषयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून शिक्षण पूर्ण केले. त्यांनी साहित्य क्षेत्रामध्ये विपुल लेखन करून नऊ पुस्तकांचे लेखन केलेले आहे. संत साहित्यामध्ये त्यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेवर आधारित 'अभ्यासाशी सांग कार्यसिद्धी', 'संत तुकारामांचे दोहे', 'मायबापे केवळ काशी' असे तीन ग्रंथ लिहिलेले आहेत.



'बालतरंग', 'माय मराठी', 'अक्षरधारा' हे बालसाहित्य प्रसिद्ध आहे. याचबरोबर 'गोफनी गुंडा' कथासंग्रह, 'कलमपिसाई' हा वात्रटिका संग्रह, 'धोकेबाज' हा कवितासंग्रह इ. पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले आहे. 'सेट' परीक्षा पात्र झाल्याबद्दल त्यांचे वारकरी संप्रदाय, शिक्षण क्षेत्र, मित्रपरिवार यांच्यासह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अनुसूचित जाती जमातींवर अन्याय करु नका-नितीन जायभाये

## अनुसूचित जाती जमातीचे शिष्टमंडळाचे बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन

**बीड/प्रतिनिधी**

आज ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ९ ऑगस्ट रोजी, जिल्हाधिकारी बीड यांना लोकप्रिय समाजसेवक तथा ओबीसी जनमोर्चाचे युवानेते व बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख नितीन जायभाये तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या सुवर्णाताई चव्हाण, राणीताई गुलरुखजहीन शेख यांच्या नेतृत्वाखाली अनेक मान्यवरांच्या समवेत अनुसूचित जाती जमातींच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. विश्वातील सर्वात मोठ्या या सार्वभौम पूर्णलोकशाही भारत देशाच्या आज राष्ट्रपती ह्या, माननीय आदरणीय द्रौपदी मुर्मू देखील अनुसूचित जाती जमातींमधूनच जन्म घेऊन आलेल्या आहेत हे विसरू नका. असे प्रतिपादन नितीनजी जायभाये यांच्या वतीने यावेळी करण्यात आले. जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी ठाकूर ठाकर जमातीला जात वैधता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी अन्याय होत आहे. त्यामुळे बीड शहरातील सकल (अनुसुचित जाती - जमाती) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करून व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरूनच सकल समाजाच्या वतीने निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण न करता एक तज्ञ लोकांची अभ्यास समिती नियुक्त करण्यात यावी महाराष्ट्र राज्यातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करून त्याविषयीचा अहवाल तयार करून सर्व निकष सादर करण्यात यावेत अनुसूचित जाती जमातीच्या लोकांचे मतं आणि गरज जाणून घेण्यात यावी आणि त्यानुसार अहवाल तयार करण्यात यावेत. लोकाची मतं आणि गरज लक्षात घेऊन अंमलबजावणी करण्यात यावी. आम्ही सर्व खालील स्वाक्षरी करणार अनुसुचित जाती जमाती आदिवासी ठाकूर टाकर जमातीतील जमात बांधव गेल्या अनेक वर्षापासून आम्हाला जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शासनाच्या वतीने अन्याय करण्यात येत आहे. आमच्याकडे अनेक महसुली व शैक्षणिक पुरावे असताना जाणीवपूर्वक सदरील प्रमाणपत्र न देण्याचा शासनाचा हेतू दिसून येतो. तरी कृपया आमच्या खालील मागण्या शासन स्तरावर मान्य करण्याच्या हेतूने आज रोजी




आम्ही आपणास निवेदन विनंतीपूर्वक सादर करीत आहोत. याबाबत सदरील निवेदनाची आपण शासनाला शिफारस करून मागण्या लवकरात लवकर मंजूर करण्यात याव्या अन्यथा आम्हा जमात बांधवांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करून शासनाला जागी करावे लागेल व याबाबत घडणाऱ्या अनुचित प्रकारास प्रशासन जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी. आदिवासी ठाकूर ठाकर जमातीच्या प्रमुख मागण्या आहेत. १९५० पूर्वीच्या पुराव्याची अट शिथिल करण्यात यावी. क्षेत्र बंधन कायदा १०८/७६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. चालीरीती परंपरांमध्ये बदल झाल्याने पडताळणी समितीने हा विषय गृहीत धरू नये.शासन निर्णयानुसार विशिष्ट कालावधीतच जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे.जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेले प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात यावे. अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समीती बरखास्त करून उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्रच जात वैधता प्रमाणपत्र गृहीत धरण्यात यावे.कुटुंबातील एक वैद्यता मिळाल्यानंतर पुढील प्रकरणात कोणतीही चौकशी न करता त्या कुटुंबातील व्यक्तीला सरसकट वैधता देण्यात यावी. अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. शिष्टमंडळाचे नेतृत्व नितीन जायभाये यांच्यासह सुवर्णा चव्हाण, वसंत चव्हाण, राजेंद्र जाधव, केशव ठाकूर, डॉ. अशोक मसलेकर एम.डी. चव्हाण, सूर्यकांत जोगदंड, राजेंद्र जाधव, गणेश खेमाडे, शेख अमेर पाशा, शाहीर पठाण, शेख राणी शेख गुलरुख जहीन, शकुंतला गुघासे, स्नेहा खंडागळे आदी उपस्थित होते.

# आ.सतीश चव्हाण यांच्या हस्ते ८५० कामगार कुटुंबांना गृहउपयोगी वस्तू व सुरक्षा संच वाटप

गंगापूर येथे कामगार कल्याण योजनेअंतर्गत आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते दि.०८/०८/२०२४रोजी गंगापूर शहरातील पांडूरंग लॉन येथे ८५० कामगार कुटुंबांना गृहउपयोगी वस्तू संच (संसार भांडे) व सुरक्षा संच (पेटी) वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी गृहउपयोगी वस्तू संच (संसार भांडे), सुरक्षा संच (पेटी) यासह विविध योजना राबविल्या जातात. मागील महिन्या पासून आमदार सतीश चव्हाण यांच्या वतीने गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील बांधकाम कामगारांसाठी नाव नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये नोंदणी केलेल्या गंगापूर शहरातील ८५० पात्र लाभार्थ्यांना आज गृहउपयोगी वस्तू संच (संसार भांडे), सुरक्षा




संच (पेटी) वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, बांधकाम कामगारांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. मात्र या योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली नसल्याने अनेक कामगार अजून या योजनांच्या लाभापासून वंचित आहेत. यापुढे गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपला पुढाकार राहिल. गंगापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण मागील दोन वर्षात भरीव असा निधी उपलब्ध करून दिला. आगामी काळात या मतदारसंघातील रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याचा आपला प्रयत्न राहिल असे देखील यावेळी आमदार सतीश चव्हाण यांनी सांगितले.यावेळी अंकुश काळवणे, संजय जाधव, सुवर्णा जाधव, मच्छिंद्र देवकर आदींनी मनोगत व्यक्त केले. तसेच पात्र लाभार्थ्यांनी सदरील संसार भांडे व पेटी दिल्याबद्दल आमदार सतीश चव्हाण यांचे आभार मानले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष फैसल चाऊस, युवकचे तालुकाध्यक्ष राजू पठाण, मोहसीन चाऊस, अशोक गायकवाड, रमेश निचीत, रावसाहेब तोगे, बदर जोहरी, प्रल्हाद निर्फळ, योगेश पाटील, सोपान देशमुख, दिनेश गायकवाड, अशोक खाजेकर, मनीषाताई बत्तीसे, संगीताताई वाघ, शंकर प्रधान, कल्याण पदार, नंदू सोनवणे आदींसह लाभार्थी कुटुंबियांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नाथ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**(बीड प्रतिनिधी)**

याबद्दल सविस्तर माहिती अशी की बीड जिल्हा क्रीडा विभाग यांचेकडून आयोजित शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेसाठी नाथ कनिष्ठ महाविद्यालय नाथापूर च्या विद्यार्थिनींची निवड झाली आहे.

नाथापूर येथील नाथ कनिष्ठ महाविद्यालयाने सदरील स्पर्धांसाठी आपला संघ क्रीडाशिक्षक श्री बाबर सरव श्रीमती पाचणकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली उपरोक्त स्पर्धांसाठी पाठवण्यात आला होता. सदरील स्पर्धा १४,१७ व १९ वर्ष वयोगटाच्या मुलींसाठी तालुकास्तरावर आयोजित करण्यात आली होती. केएसपी विद्यालय कालिका नगर बीड या ठिकाणी सकाळी दहा वाजता स्पर्धा सुरू झाल्या. सदरील स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कुमारी मते आकांक्षा सर्जेराव (१२ वी विज्ञान ) कुमारी शेख महिन नसीर (१२ वी विज्ञान ) व कुमारी प्रधान पूनम लक्ष्मण (११ विज्ञान ) या विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदवला.दुपारी बारा वाजता निकाल हाती आल्यानंतर कुमारी शेख माहीन नसीर ही विद्यार्थिनी सर्वप्रथम तर कुमारी मते आकांक्षा अर्जुन ही विद्यार्थिनी द्वितीय आणि कुमारी प्रधान पूनम लक्ष्मण ही विद्यार्थिनी तृतीय क्रमांकाने विजयी झाले असून त्यांची जिल्हास्तरासाठी निवड करण्यात आली आहे

विजेत्या विद्यार्थ्यांचे व क्रीडाशिक्षकांचे अभिनंदन नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे मार्गदर्शक आदरणीय श्री मदनराव (भाऊ )चव्हाण माजी जिल्हा परिषद सदस्य पिंपळनेर तसेच नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच आदरणीय मयुरी ताई सुंदरराव चव्हाण सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच साईनाथ मतिमंद निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अशोक चव्हाण सर ,नाथ हायस्कूल नाथापूर चे मुख्याध्यापक श्री धुरवडे सर तसेच नाथ कनिष्ठ महाविद्यालय नाथापूरचे प्राचार्य श्री गोविंद चव्हाण सर यांनी केले आहे.सदरील स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वृक्षारोपण करून पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन जैवाळ परिवाराचा स्तुत्य

**सिल्लोड (संभाजीनगर प्रतिनिधी)**

: पळशी तालुका सिल्लोड येथील कै.संजय जैवाळ यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त जोगेश्वरी हायस्कूल पळशी येथे वृक्षारोपण करून अभिवादन करण्यात आले. एकीकडे मोठया प्रमाणात वृक्षतोड होऊन सिमेंटची जंगले उभी राहत आहे. यामुळे मोठया प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत असून वातावरणातील ऑक्सिजन दिवसेंदिवस कमी पडत असून यामुळे मानवी जीवनावर परिणाम होत आहे. हे कुठेतरी थांबावे या करीता पळशी येथील जैवाळ परीवाराने सदरचा उपक्रम राबवून समाजासमोर आदर्श उभा केला आहे. या कार्यक्रमासाठी माऊली वारकरी संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर महाराज पवार, जेष्ठ विचारवंत नामदेवराव चापे, शिवशारदा शिक्षण संस्थेचे सचिव कृष्णा



लहाने, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष शेख शपिक,मा.प.स सभापती कौतिकराव बडक, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष राहुलकुमार ताठे, जोगेश्वरी हायस्कूल चे प्राचार्य गणेश बडक, फुलंब्री भाजपाचे तालुका उपाध्यक्ष राम बनसोड,केळगाव वि.का. सो चेअरमन विजय पवार, पळशीचे सरपंच भाऊसाहेब बडक,प. स सदस्य नारायण बडक,पळशी वि.का.सो चेअरमन अंबादास पुंगळे, दिपक बडक,मा.सरपंच अर्जुन बडक, महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय बडक,दादाराव गोडसे,पांडुरंग शिंदे,शिक्षक साहेबराव बडक,अशोक पांढरे,भगवान परचुरे,रविंद्र बडक, योगेश परचुरे, परमेश्वर बडक,अशोक मोरे,गजानन डीगावकर,देविदास राऊत, तुळशीदास कुदळे,शिवाजी कुदळे, रखमाजी कुदळे,हिरामण धांडे, त्रिंबक देवमाळी, संतोष घोडके, ज्ञानेश्वर घोडके, दिगंबर खरात, संतोष मैंद, ज्ञानेश्वर पवार, पैठण प्रतिनिधि श्रीपत पवार, सुखदेव काटकर,सुनील नेवगे,गणेश पांडव यांच्यासह पळशी ग्रामस्थ,आप्तेष्ट,नातेवाईक,पाहुणे मंडळी मोठया प्रमाणात उपस्थित होते. कै.संजय जैवाळ हे भीमराव जैवाळ, गणपत जैवाळ यांचे बंधू,शब्दभूमी न्यूज चे संपादक सागर जैवाळ,अक्षय जैवाळ यांचे वडील तर पळशीचे पोलिस पाटील सुदाम जैवाळ माऊली वारकरी संस्था तथा संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय निल्लोड फाटा चे मुख्याध्यापक कृष्णा जैवाळ तसेच, गणेश जैवाळ, काकासाहेब जैवाळ,भगवान जैवाळ यांचे चुलते होते.

# पिक कर्ज मागणीसाठी किसान सभेची परळी तहसील कार्यालयावर निदर्शन

**परळी/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळावे, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर लावलेले होल्ड काढावेत, वाण धरणावरील वीज पंपाची तोडलेली वीज तात्काळ जोडून द्यावी, मागच्या वर्षीचा पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावा व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने गुरुवार दि ८ रोजी परळी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी निदर्शने केली. या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी केले. राज्य व केंद्र सरकार शेतकऱ्यांना विविध योजनेतुन फायदा देत असल्याच्या जाहिराती वर करोडोचा खर्च करीत असताना राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गाने अडवणुक करण्याचे काम बँक प्रशासन करीत आहेत. यापुढे बँकानी शेतकऱ्यांची अडवणुक केल्यास संबंधित बँकाच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा कॉ अजय बुरांडे यांनी दिला आहे.याप्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ सुदाम शिंदे, कॉ भगवान बडे, कॉ मुक्तेश्वर कडभाने, धनंजय सोळंके, कॉ मनोज देशमुख, कॉ पप्पु देशमुख, कॉ मनोज स्वामी, कॉ विष्णु देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी शेतकऱ्यांच्या घोषणेनी तहसीलचा परिसर दणाणुन गेला होता. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांना देण्यात आले. अधिकारी व किसान सभेचे पदाधिकारी यांची परळी तहसील कार्यालयात १३ ऑगस्ट रोजी बैठक बोलाविण्यात आली



पिक कर्ज व बँकाच्या समस्या संबंधी सहाय्यक निबंधक, राष्ट्रीयकृत बँकांचे असल्याचे तहसील प्रशासनाने किसान सभेला पत्र दिले आहे.

# परळीचे इंजि.राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

परळी/प्रतिनिधी मुंबई मेट्रो रेल्वेचे व्यवस्थापक इंजि राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड झाल्याबद्दल परळी येथील त्यांच्या गावात आनंद साजरा केला जात आहे. त्यांच्या निकटवर्तीय मित्र मंडळी यांनी सुगंधकुटी बुद्धविहार या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या पदाधिकारी व भिमनगर,जगतकर गल्ली येथील ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या हस्ते निवड झाल्याबद्दल शाल,हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, पत्रकार बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू आहेत, तसेच पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या प्रसंगी या भागातील अनेक, युवक,तरुण,ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# केज तालुक्यात लाडकी बहीण योजनेचे २७ हजार ८८२ अर्ज मंजूर

## अशासकीय सदस्य शंकर बापू तपसे यांची माहिती

**केज।प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली केज मध्ये झालेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पहिल्याच ऑनलाइन प्रस्ताव पडताळणी समितीच्या बैठकीत केज तालुक्यात २७ हजार ८८२ अर्जाचा समावेश असल्याची माहिती अशासकीय सदस्य शंकर बापू तपसे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज हे सर्व कागदपत्रांसह ३१ ऑगस्ट पर्यंत स्वीकारण्यात येणार असून सध्या अर्ज सादर करण्याची व छाननी प्रकिया सुरू आहे.त्रुटीमुळे नामंजूर करण्यात आलेल्या अर्जाची आवश्यक जुटी पुर्ण केल्यानंतर संबंधित सर्व अर्ज मंजूर करण्यात येणार आहेत. नारीशक्ती दुत पवरून व वेब अप्लिकेशन लिंकवर सदरील अर्ज भरावेत.नवीन अर्ज भरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळाच्या



सर्व्हरचे कामकाज सुरू असून दोन दिवसा नंतर या लिंकवर व नारी शक्ती दूतवर अर्ज भरता येणार आहेत. तर नव्याने आलेले अर्ज व ऑफलाईन पध्दतीने शिल्लक असलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे काम दोन दिवसानंतर सुरळीत होईल. अशी माहिती ही अशासकीय सदस्य शंकर बापू तपसे यांनी दिली आहे.

# भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या मराठवाडा संघटकपदी चंद्रकात खरात सर यांची नियुक्ती

## मित्र परिवाराकडुन अभिनंदनाचा वर्षाव

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील दलित चळवळीमध्ये गेले २५ ते ३० वर्षापासून एकनिष्ठ सक्रिय काम करणारे नाव लौकिक असलेला कार्यकर्ता म्हणून सर्वांशी परिचित असलेले चंद्रकांत खरात सर यांच्या कार्याची माजी सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य तथा खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी दखल घेऊन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या मराठवाडा संघटकपदी नियुक्ती केली आहे. चंद्रकांत खरात सर यांनी अनेक पक्ष



व संघटनेमध्ये काम करून गोरगरिबांचे शासन स्तरा वर प्रश्न मांडून कामे मार्गे लावली असल्यामुळेत्यांचा तालुक्यासह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनसंपर्क पाहावयास मिळत आहे.चंद्रकांत खरात सर हे वंचितबहुजन आघाडीमध्ये काम करत होते.परंतु सध्या त्यांनी वंचित बहुजन आघाडीला सोडून देऊन खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी भीमशक्ती सामाजिक संघटनेमध्ये दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रवेश केला आहे. खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी भीम शक्ती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष संतोष भिंगारे यांना चंद्रकांत खरात सर त्यांना नियुक्ती देण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशावरून संतोष भिंगारे यांनी चंद्रकांत खरात सर यांची मराठवाडा संघटकपदी निवड करण्यात आली आहे.संतोष भिंगारे यांनी चंद्रकांत खरात सर यांना मराठवाडा संघटकपदाच्या नियुक्तीचे पत्र देऊनत्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. चंद्रकांत खरात सर यांच्या निवडी मुळे त्यांच्या कार्यकर्त्यां मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.सदर निवडीमुळे चंद्रकांत खरात सर यांना सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बीडचे भूमिपुत्र डॉ.वायबसे विद्यावाचस्पती पदवीने दिल्लीत सन्मानित

**बीड।प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कासारी गावचे भूमिपुत्र तथा प्रसिद्ध डॉक्टर ह.भ.प चत्रभूज वायबसे महाराज यांनी प. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ, वृंदावन धाम मथुरा द्वारा आयोजित विद्या वाचस्पति पीएच डी पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी मुख्य अतिथी पद्मश्री माननीय डॉ. अरविंद कुमार जी, मा. डॉ. सुवर्णलता पांचाळ जी, डॉ युनू भूषण मिश्रा जी, डॉ श्री दीपा मिश्राजी, डॉ विश्वनाथ पाणीग्रही जी, यांच्या हस्ते नवी दिल्ली या ठिकाणी हा सन्मान सोहळा पार पडला. या मुख्य कार्यक्रमास महाराष्ट्रातून दोनच व्यक्तींना आमंत्रीत करण्यात आले होते.



बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातून अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत असताना आपले वैद्यकीय उच्च शिक्षण पूर्ण करणारे केज शहरात गेल्या पंधरा वर्षापासून वायबसे हॉस्पिटल या नावाने रुग्णाच्या सेवेत सुरु आहे. डॉ छत्रभुज वायबसे यांना आध्यात्मिक क्षेत्राची आवड असल्याने त्यांनी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कीर्तन सेवेच्या रूपातुन लोकांना समुपदेशन, किर्तन सेवेच्या माध्यमातून समाजसेवा, समाजसेवेच्या माध्यमातून अध्यात्मिक सेवा ते नेहमीच करताना दिसून येत आहेत. त्यांनी नुकताच प दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ द्वारा" विद्या वाचस्पती " (शास्त्री ) ही पदवी प्रदान करण्यात आली. या यशाबद्दल वैद्यकीय,आध्यात्मिक

# महादेव ढाकणे राज्यशास्त्र विषयात सेट उत्तीर्ण



केज ।सचिन भालेराव

तालुक्यातील सांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महादेव उद्धव ढाकणे हे राज्यशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. विविध ठिकाणी त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. प्राथमिक शाळेत अध्यापनाची आवड असलेले शिक्षक म्हणून श्री ढाकणे यांचा लौकिक आहे.अध्यापन करताना स्वतः अभ्यासात सातत्य ठेवून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सहाय्यक प्राध्यापक पात्रता सेट परीक्षा उत्तीर्ण झाले.मित्रपरिवार कुटुंब ,अक्षर परिवार , जि प प्रा शा सांगवी शाळेचे शा व्य समिती अध्यक्ष, सदस्य, सरपंच ,गावकरी व तालुक्यातील शिक्षकवृंद,शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

# जासई हायस्कूलमध्ये कर्करोग उपचार व लसीकरण मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न.

**उरण। प्रतिनिधी**

दिपिशा कॅन्सर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिट्यूट नवी मुंबई कर्करोग उपचार डे केअर सेंटर यांच्या मार्फत एच.पी.व्ही लसीकरण (व्हॅक्सिनेशन) किंवा सर्व्हिकल कॅन्सर लसीकरण (व्हॅक्सिनेशन) आणि नियमित तपासणी या कर्करोगापासून बचाव करण्यासाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले.रयत शिक्षण संस्था श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल व लोकनेते दि .ब .पाटील ज्युनिअर कॉलेज जासई येथे हे शिबीर पार पडले.यावेळी डॉ .दिपाली गोडघाटे (अध्यक्ष दिपिशा कॅन्सर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिट्यूट नवी मुंबई),डॉ.श्रद्धा पाटील -खारकर (उपाध्यक्ष दिपिशा कॅन्सर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिट्यूट नवी मुंबई),निलेश ठाकूर (सदस्य दिपिशा कॅन्सर सेंटर अँड रिसर्च इन्स्टिट्यूट नवी मुंबई), ग्रुप ग्रामपंचायत जासई सदस्य कु .आदित्य यशवंत घरत,वीणा घरत , रयत शिक्षण संस्था श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल व लोकनेते दि .ब .पाटील ज्युनिअर कॉलेज जासई प्राचार्य अरुण घाग, सर्व शिक्षक



व महिला माता पालक आणि विद्यार्थिनी आदी मान्यवर उपस्थित होते.या शिबिराचे आयोजन मोकाशी मॅडम,बाबर मॅडम, पाटील मॅडम ठाकरे सर, शिंदे सर यांनी केले.

# वैद्यकिय महाविद्यालयाच्या मागणीला आरोग्यमंत्री नड्डांकडून होकार खा.बजरंग सोनवणेंनी भेट घेवून केली सविस्तर चर्चा

बीड: बीडसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय आरोग्यमंत्री जगतप्रकाश नड्डा यांची भेट घेवून केली. यावेळी नड्डा यांनी सदरील मागणीचे पत्र वाचून लवकरच याबाबत निर्णय घेवू, असा होकारही दिला. यावेळी खा.सोनवणे यांनी जिल्ह्याच्या आरोग्य विभागाच्या दृष्टीने सविस्तर चर्चाही केली. दि.९ ऑगस्ट रोजी केंद्रीय आरोग्य मंत्री नड्डा यांची बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी नड्डा यांनी बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागासंबधित असलेल्या अडचणींबाबत जाणून घेतले. यावेळी बीडच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बीडला झालेच पाहिजे, असा आग्रह खा.सोनवणेंनी धरला. शिवाय बीड जिल्ह्यातील आरोग्यव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, अशा



स्थितीत मेडिकलच्या विद्यार्थ्यांचेही भवितव्य अंधारात आहे.या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्ह्याला मायबाप शासनाने हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून द्यावे. जिल्ह्याला कुठलीही कमतरता भासणार नाही, असे सांगत जिल्हाभरातील आरोग्यव्यवस्था व इतर बाबींवर त्यांच्याशी विस्तृत चर्चा केली.बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागातील अडचणींवर लवकरच प्रभावी निर्णय घेऊन उपाय करू, शासकीय वैद्यकीय महाविद्यालया संदर्भात देखील शासन गांभीर्यपूर्वक विचार करेल, असा विश्वास मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी दिला. लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर खा.सोनवणे यांनी जिल्हाभर हार-तुरे करत बसण्यापेक्षा कामाला महत्व दिले असून जिल्ह्यातील नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे असलेले आरोग्य विभागातील प्रश्न ते मांडत आहेत. या निमीत्ताने जिल्हा आरोग्य यंत्रणेत बदल होईल, असे दिसत आहे.

## आमदार संजय मामा शिंदे यांच्या हस्ते नुतन पोलिस पाटील सौ. प्रीती उपासे (शिंदे) यांचा सत्कार

**सोलापूर।विश्वास चोपडे**

निमगाव टे तालुका माढा जिल्हा सोलापूर येथे दि..९/८/२०२४ रोजी सकाळी शिंगेवाडी तालुका माढा गावच्या नुतन पोलिस पाटील सौ. प्रीती हनुमंत उपासे (शिंदे) यांचा सन्मान करताना करमाळा व माढा विधानसभा मतदारसंघा चे विकास प्रिय आमदार संजय मामा शिंदे सौ .प्रीती हनुमंत उपासे ( शिंदे ) यांना १०० पैकी ७५ गुण मिळाले त्यांना ६/८/२०२४ रोजी शिंगेवाडी गावच्या नुतन पोलिस पाटील पदी नियुक्ती पत्र मिळाले सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे



या वेळी माजी पंचायत समिती सदस्य शहाजी आबा शिंदे, शिंगेवाडी सरपंच शिवाजी सोलवणे, समाधान शिंदे, वैभव शिंदे,लक्ष्मण शिंदे,सचिन शिंदे सर व निंभोरे (तालुका करमाळा) सरपंच रविंद्र वळेकर,लोकप्रिय निवेदक विलासराव दोलतडे बादलेवाडी आदी उपस्थित होते.

## घरोघरी तिरंगा अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ तिरंगा रॅलीस जालनेकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**(जालना-प्रतिनिधी)**

देशभरात दि. ९ ते १५ ऑगस्ट २०२४ दरम्यान "घरोघरीतिरंगा" अभियान राबविले जात आहे. या पार्श्वभूमीवर जालनाजिल्ह्यात १५ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये घरोघरी तिरंगा अभियानसह,सांस्कृतिक कार्यक्रम, स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबियांचा सन्मान तसेच विविध नाविन्यपूर्णउपक्रम राबविले जाणार आहेत. या अभियानात जिल्हयातील सर्व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. घरोघरीतिरंगा अभियानानिमित्त महानगरपालिकेच्यावतीने आज काढण्यात आलेल्या तिरंगा सायकलरॅलीच्या शुभारंभप्रसंगी



जिल्हाधिकारी बोलत होते. रॅलीस जालनेकरांचा भरभरुन प्रतिसाद लाभला. आज सकाळी जालना शहरातील हुतात्मा जनार्धन मामा चौकातून सायकल रॅलीचाशुभारंभ झाला. स्वत: जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षकअजयकुमार बन्सल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, मनपा आयुक्त आयुक्त संतोषखांडेकर यांनी सायकल चालवीत या रॅलीमध्येसहभाग घेतला. रॅलीमध्ये मोठया संख्येने युवक, नागरिक, अधिकारी, कर्मचारी सहभागीझाले होते. रॅलीच्या वेळी देण्यात येत असलेल्या विविध देशभक्तीपर घोषणांनी शहरदुमदूमून गेले होते. मामा चौक, सुभाष चौक, मंमादेवी चौक, गांधी चमन चौक, रेल्वेस्टेशन रोड, उड्डाणपूल, नूतन वसाहत मार्गे, अंबड चौफुली येथे पोहोचल्यावर रॅलीचा समारोपझाला. रॅलीत विभागीय पोलीस अधिकारी अनंतकुलकर्णी, महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, सहायक आयुक्त केशव कानपुडे, डॉ. कैलाससचदेव, विजय आगळे, महापालिकेचे राहुल देशमुख, विजय फुलंब्रीकर, स्वच्छता विभागप्रमुख पंडित पवार, सय्यद सौद, संजय वाघमारे, जगत घुगे, संजय भालेराव, बंडूचव्हाण, अशोक लोंढे, राजेश बगळे, अनिता चंद्रहास, आशा गाडे आदी महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

## रांजणी येथील श्री स.भु. प्रशालेत क्रांतीदिन साजरा

**जालना/असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत शुक्रवारी क्रांतीदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वातंत्र्य लढ्यातील सर्व क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी पर्यवेक्षक एस.आर. जहागीरदार, ज्येष्ठ शिक्षक अतुल हेलसकर, ज्येष्ठ शिक्षिका उषा जाधव



उपस्थित होते. इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु.गायत्री मोरे हिने महात्मा गांधीजींचे भारत छोडो आंदोलन याबद्दल माहिती दिली. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी भारतीयांना सहभागी करून घेतले. त्यामुळे भारतीयांमध्ये असंतोष पसरला याविषयीची माहिती दिली. सहशिक्षक ज्ञानेश्वर वनगुजरे यांनी याच दिवशी जपानच्या नागासाकी या शहरावर झालेल्या हल्ल्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. एस.आर.जहागीरदार यांनी ऑगस्ट क्रांती दिनाची माहिती देऊन विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांचे कार्य व त्यांचे बलिदान या विषयी माहिती दिली. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



पोलिस भरती मध्ये यश संपादन केल्याप्रकरणी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा जिवाचीवाडी ता.केज येथे विक्रम मोकिंदा चौरे (सातारा पोलिस),प्रिती बळीराम चौरे (संभाजीनगर पोलिस) यांच्या जन्मभुमित भागवत चौरे,शिवाजी चौरे ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपास्थिती मध्ये संपन्न झाला प्रसंगी जिवाचीवाडी येथील समस्त गावकरी व तरूण युवा मंडळ.

# केज विधानसभेची उमेदवारी देताना महाविकास आघाडीने बौद्ध व्यक्तीला प्राधान्य द्यावे- ॲड.अनंतराव जगतकर

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघात आज पर्यंत झालेल्या निवडणूकीत उमेदवारी देताना बौद्ध समाजाला म्हणावे तितकी संधी प्राप्त झाली नाही. केज विधानसभा मतदारसंघात बौद्ध समाजाची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूकीत उमेदवारी देताना महाविकास आघाडीने बौद्ध व्यक्तीला प्राधान्य द्यावे अशी मागणी काँग्रेस नेते अनंतराव जगतकर यांनी केली आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. मागील काही दिवसांपासून अनुसुचित जाती राखीव केज विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय काँग्रेसचे जेष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर हे आगामी 2024 ची निवडणूक साठी इच्छुक आहेत.त्या पार्श्वभूमीवर ॲड.जगतकर यांनी केज मतदारसंघातील प्रमुख नेत्यांच्या, सर्वसामान्य जनतेच्या आणि विविध समाज घटकांच्या गाठी-भेटी घेऊन त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली आहे. हे त्यांनी अंबाजोगाई येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून दिसून आले. ॲड.जगतकर हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते असल्याने त्यांनी महाविकास आघाडीकडे केजच्या राखीव जागेची उमेदवारी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मागितली आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना ॲड.जगतकर यांनी 1978 साली मुंबई येथील नौकरी सोडून ते अंबाजोगाई येथे आल्यानंतर त्यांनी डी.एस.मुंडे, ॲड.वामनराव गंगणे, ॲड.सिद्धीकी, खतीब या चार-पाच सहकाऱ्यांना सोबत घेऊन अंबाजोगाईत काँग्रेस पक्षाची शाखा स्थापन केली. पंजाच्या चिन्हावर अंबाजोगाई नगरपालीकेची निवडणूक लढवून त्यांनी पाच नगरसेवक निवडून आणले होते. त्यानंतर ॲड.जगतकर यांनी 1985 साली केज विधानसभेची निवडणूक लढवली होती. या निवडणूकीत त्यांचा अत्यल्प मतांनी पराभव झाला. या पराभवानंतर ही त्यांनी राष्ट्रीय नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठेने काम केले. काँग्रेस पक्षाकडे केज विधानसभा मतदारसंघात बौद्ध व्यक्तीला उमेदवारी द्यावी अशी मागणी केली. बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला एक किंवा तीन जागा मिळाव्यात अशी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भावना आहे. याचा उमेदवारी देताना विचार व्हावा असे सांगून ॲड.जगतकर



म्हणाले की, पक्षाकडून आदेश आल्यास आपण केज मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहोत. त्या दृष्टीने आपण तयार आहोत. मतदारसंघात शेतीपुरक उद्योग, व्यवसाय उभारले पाहिजेत, शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे, वॉटरग्रीड सारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीला पाणी उपलब्ध झाले पाहिजे. केंद्र व राज्य सरकारच्या वतीने मोठा प्रकल्प आल्यास बेरोजगारांना रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होतील. उमेदवारी देताना बौद्ध समाजाला का डावलले जाते ? हे लक्षात येत नाही. केज मतदारसंघात व बीड जिल्ह्यात काँग्रेसला, महाविकास आघाडीला अनुकुल वातावरण आहे. त्यामुळे आपण मागील काही दिवसांपासून मान्यवरांसह सर्वसामान्य मतदारांच्या गाठी-भेटी घेत आहोत. त्यांच्याकडून चांगला प्रतिसाद लाभत आहे. केज मतदारसंघात जनतेला नविन चेहरा हवा आहे. मी निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे. मला सर्वधर्मिय समाज बांधवांचे समर्थन आहे., बौद्ध समाजाचा एक घटक म्हणून मी उमेदवारीची मागणी करीत आहे. काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली तर आपण महाविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढविणार आहोत असे ॲड. अनंतराव जगतकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे शहराध्यक्ष आसेफोद्दीन बाबा खतीब यांनी ॲड. जगतकर यांच्या मताशी आपण सहमत आहोत. आमचा त्यांना पाठींबा आहे. बीड जिल्ह्यात मराठा, मुस्लिम आणि बौद्ध समाजाला उमेदवारी देण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरू आहे. बीड जिल्ह्यात काँग्रेसकडे जनाधार असल्याचे शहराध्यक्ष खतीब यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष वसंतराव मोरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077